A ← संच क्रमांक

2019

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO.

B13
107253

प्रश्नपुस्तिका–2
मराठी व इंग्रजी

वेळ : 1 ( एक ) तास

एकूण प्रश्न : 100
एकूण गुण : 100

# सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा–क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा–क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ↑ केंद्राची संकेताक्षरे | | | | | | ↑ शेवटचा अंक | |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक तीन चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील''.**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

1. यास्तव, तस्मात, अतएव या उभयान्वयी अव्ययाचा प्रकार ओळखा.

(a) समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यय (b) विकल्पबोधक उभयान्वयी अव्यय

(c) न्यूनत्वबोधक उभयान्वयी अव्यय (d) परिणामबोधक उभयान्वयी अव्यय

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (a) आणि (c) बरोबर (2) केवळ (b) बरोबर

(3) केवळ (b) आणि (d) बरोबर (4) केवळ (d) बरोबर

---

2. वाक्प्रचार व त्याचा अर्थ यांच्या जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | तारे तोडणे | (i) | फार जवळ येणे |
| (b) | तोंड टाकणे | (ii) | नवल करणे |
| (c) | तोंडात बोट घालणे | (iii) | अद्वातद्वा बोलणे |
| (d) | तोंडावर येणे | (iv) | वेड्यासारखे बोलणे |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (ii) | (i) | (iii) |
| (2) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (3) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (4) | (iv) | (iii) | (ii) | (i) |

---

3. 'कोल्हेकुई करणे' या वाक्प्रचाराचा अर्थ सांगा.

(a) खूप मोठ्याने ओरडणे (b) बडबड करणे

(c) व्यर्थ ओरड करणे (d) पळून जाणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) बरोबर (2) (c) आणि (d) बरोबर

(3) फक्त (a) बरोबर (4) फक्त (c) बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

4. अचूक वाक्याची जोडी ओळखा.

(a) विजा चमकु लागल्या आणि पावसाला सुरुवात झाली - विकल्पबोधक अव्यये.

(b) लोक आपली स्तुती करोत अथवा निंदा - समुच्चयबोधक अव्यये.

(c) मरावे परि कीर्तिरूपे उरावे - न्यूनत्वबोधक अव्यये

(d) वाटेत मोटार नादुरस्त झाली म्हणून यावयास उशीर झाला - परिणामबोधक अव्यये.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर (2) फक्त (b) व (c) बरोबर

(3) फक्त (c) व (d) बरोबर (4) फक्त (a), (b), (c) व (d) बरोबर

---

5. 'पार्वतीने नीलकंठास वरले' यातील समास ओळखा.

(a) बहुव्रीही समास (b) द्वंद्व समास

(c) तत्पुरुष समास (d) अव्ययीभाव समास

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (b) दोन्ही बरोबर (2) फक्त (a) बरोबर

(3) फक्त (c) आणि (d) बरोबर (4) फक्त (d) बरोबर

---

6. राजाने अलबत्या गलबत्यांना सभेतच अर्धचंद्र दिला, म्हणून त्यांची कणीक तिंबली गेली नाही.

वरील वाक्समुहातील वाक्प्रचार व त्याचा **योग्य** अर्थ ओळखा.

(a) अलबत्या गलबत्या – क्षुल्लक माणूस

(b) अर्धचंद्र देणे – गचांडी देणे

(c) कणीक तिंबणे – खूप मार देणे

(d) वरील सर्व पर्याय चूक आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (b) बरोबर (2) फक्त (c) व (d) बरोबर

(3) फक्त (a), (b) व (c) बरोबर (4) फक्त (d) बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

7. योग्य जोड्या जुळवा :

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (a) | उपसर्गघटित | (i) | प्रबल |
| (b) | प्रत्ययघटित | (ii) | संहार |
| (c) | शब्दसाधिते | (iii) | डावपेच |
| (d) | अभ्यस्त शब्द | (iv) | गुरुत्व |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (2) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (3) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (4) | (iv) | (ii) | (iii) | (i) |

---

8. रामूने काठी घेतली. त्याने कुत्र्याला झोडपले. या वाक्याचे केवलवाक्य कोणते होईल?

(1) रामूने काठी घेतली व कुत्र्याला झोडपले.

(2) रामूने काठी घेवुन कुत्र्याला झोडपले.

(3) रामूने काठी घेतली आणि कुत्र्याला झोडपले.

(4) यापैकी नाही.

---

9. विसर्गसंधीची उदाहरणे कोणती ?

(a) सदानंद, सज्जन

(b) सूर्यास्त, विद्यामृत

(c) निराधार, मनोबल

(d) निराधार, सज्जन

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b) बरोबर

(2) (a), (b), (d) चूक, (c) बरोबर

(3) (a), (b), (c) चूक, (d) बरोबर

(4) फक्त (a) बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

10. पाऊस पडण्याची शक्यता आहे कारण ढग दाटून आले आहेत. या वाक्यातील वाक्यसंकलन प्रकार ओळखा.

(1) संयुक्तवाक्य (2) मिश्रवाक्य (3) केवलवाक्य (4) यापैकी नाही

11. 'फळे मधुर खावया असति नित्य मेवे तसे

हिरेजडीत सुंदरी कनक पंजरीही वसे'

या काव्य-पंक्तीतील 'शब्दशक्ती' ओळखा.

(1) अभिद्या (2) लक्षणा (3) व्यंजना (4) योगरुढ

12. खालीलपैकी कोणता शब्द परस्परांचे विरुद्धार्थी शब्द या अर्थाने आलेला आहे ?

(a) जमाखर्च (b) सगेसोयरे (c) तेजीमंदी (d) हारजीत

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b) बरोबर (2) फक्त (a), (b) व (c) बरोबर

(3) फक्त (a), (c) व (d) बरोबर (4) वरील सर्व बरोबर

13. पुढीलपैकी कोणता जोड शब्द 'विसर्ग-उकार-संधी' चे उदाहरण आहे ?

(1) उच्छेद (2) सज्जन (3) उल्लंघन (4) यशोधन

14. पुढीलपैकी समुच्चयबोधक संयुक्त वाक्याचे **योग्य** उदाहरण कोणते ?

(1) गड आला पण सिंह गेला.

(2) तू आज माझ्याकडे ये किंवा तू ते काम परस्परच उरकून टाक.

(3) मोठा भाऊ सकाळीच आला म्हणून मी मुंबईला जायचा थांबलो.

(4) ती मुंबईला गेली आणि तिथे तिने नाटकात कामे केली.

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**15.** सामासिक शब्द व समास यांच्या योग्य जोड्या ओळखा.

| | **शब्द** | | **समास** |
|---|---|---|---|
| (a) | देवदत्त | – | चतुर्थी तत्पुरुष |
| (b) | देवालय | – | द्वितीया तत्पुरुष |
| (c) | पदच्युत | – | पंचमी तत्पुरुष |
| (d) | भूपती | – | षष्ठी तत्पुरुष |

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (a) व (c) बरोबर, (b) व (d) चूक

(2) केवळ (c) व (d) बरोबर, (a) व (b) चूक

(3) केवळ (b) व (c) बरोबर, (a) व (d) चूक

(4) केवळ (a) व (d) बरोबर, (b) व (c) चूक

---

**16.** 'क्रांती' या शब्दाचा अचूक शब्दसमूह कोणता ?

(a) कोणत्याही क्षेत्रात हळूहळू होणारा इष्ट बदल

(b) कोणत्याही क्षेत्रात चळवळींने होणारा इष्ट बदल

(c) कोणत्याही क्षेत्रात एकदम होणारा इष्ट बदल

(d) कोणत्याही क्षेत्रात औद्योगिकीकरणाने होणारा इष्ट बदल

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b) बरोबर
(2) फक्त (a) बरोबर
(3) फक्त (c) आणि (d) बरोबर
(4) फक्त (c) बरोबर

---

**17.** हे चित्र अत्यंत सुंदर आहे. या वाक्याचे उद्‌गारार्थी वाक्य पुढीलप्रमाणे.

(1) काय सुंदर आहे चित्र हे!
(2) किती सुंदर चित्र हे!
(3) भयानक सुंदर चित्र आहे हे!
(4) शाबास! किती सुंदर चित्र हे!

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

18. 'मनस्वी आणि कार्यार्थी पुरुष हताश होऊन स्वस्थ बसत नाही ?

या वाक्याचे मिश्रवाक्यात रूपांतर असलेले अचूक उदाहरण :

(1) मनस्वी आणि कार्यार्थी पुरुष हताश होत नाही.

(2) मनस्वी आणि कार्यार्थी पुरुष हताश होऊन स्वस्थ बसत नाही.

(3) मनस्वी आणि कार्यार्थी पुरुष स्वस्थ कधीच नसतात.

(4) मनस्वी आणि कार्यार्थी पुरुष जसा हताश होत नाही तसा तो स्वस्थही बसत नाही.

---

19. क्रियाविशेषण अव्ययांनी जोडलेल्या वाक्यास काय म्हणतात ?

(a) केवलवाक्य (b) मिश्रवाक्य (c) संयुक्तवाक्य (d) स्वार्थी वाक्य

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर (2) फक्त (b) व (c) बरोबर

(3) फक्त (b) बरोबर (4) फक्त (c) व (d) बरोबर

---

20. जोड्या लावा.

(a) हरीने गाईस बांधले (i) कर्म-भाव संकर प्रयोग

(b) आज सारखे गडगडते (ii) सकर्मक भावे प्रयोग

(c) मधुकररावांनी आपल्या मुलाला शाळेत घातला (iii) कर्तृ-कर्म-भाव संकर प्रयोग

(d) तू बाहुलीला पाडलीस (iv) अकर्तृक भावे प्रयोग

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (2) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (3) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (4) | (iv) | (iii) | (ii) | (i) |

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**21.** पुढील म्हणी व त्यांचे अर्थ-**योग्य** जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | कशात काय नि फाटक्यात पाय | (i) | क्षुल्लक अपराधाचा मोठ्या अपराधाशी संबंध जोडणे. |
| (b) | काडीचोर तो माडीचोर | (ii) | आपल्या जवळच्या थोड्याशा संपत्तीचे प्रदर्शन करणे. |
| (c) | कानात बुगडी, गावात फुगडी | (iii) | वाईटात आणखी वाईट घडणे. |
| (d) | काशीत मल्हारी माहात्म्य | (iv) | नको तेथे नको ती गोष्ट करणे. |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (2) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (3) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (4) | (iv) | (ii) | (i) | (iii) |

---

**22.** खालील वाक्य वाचा.

(a) सर्वनाम ही शब्दजाती इंग्रजीवरुन स्वीकारली आहे.

(b) संस्कृतमध्ये सर्वनाम ही स्वतंत्र शब्दजाती नाही.

(c) सर्वनाम नामाबद्दल विशेष माहिती सांगते.

(d) नामाची पुनरुक्ती टाळण्यासाठी योजलेला विकारी शब्द म्हणजे सर्वनाम होय.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b) बरोबर बाकी सर्व चूक
(2) फक्त (a), (b) व (c) बरोबर बाकी सर्व चूक
(3) फक्त (d) बरोबर (a), (b) व (c) चूक
(4) वरील सर्व बरोबर

---

**23.** योग्य जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | सकर्मक क्रियापद | (i) | मी रस्त्यात पडलो. |
| (b) | अकर्मक क्रियापद | (ii) | गवळी धार काढतो. |
| (c) | सहाय्यक क्रियापद | (iii) | तो शिक्षकाच्या व्यवसायात स्थिरावला. |
| (d) | साधित क्रियापद | (iv) | क्रीडांगणावर मुले खेळू लागली. |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (2) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (3) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (4) | (iv) | (i) | (iii) | (ii) |

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

24. 'दाम तसे काम' या अर्थाची म्हण शोधा.

(a) जन्मा आला हेला पाणी वाहत मेला.
(b) डोंगर पोखरुन उंदीर काढणे.
(c) जशी देणावळ तशी धुणावळ.
(d) जळत्या घराचा पोळता वासा.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (b) बरोबर
(2) फक्त (c) आणि (d) बरोबर
(3) फक्त (b) बरोबर
(4) फक्त (c) बरोबर

---

25. 'त्याचा धाकटा मुलगा आज क्रिकेटच्या सामन्यात चांगला खेळला.' या वाक्याच्या वाक्यपृथक्करणाच्या जोड्या लावा.

| **वाक्य** | | **वाक्यपृथक्करण** | |
|---|---|---|---|
| (a) | त्याचा धाकटा | (i) | विधेय विस्तार |
| (b) | मुलगा | (ii) | उद्देश्य |
| (c) | आज क्रिकेटच्या सामन्यात | (iii) | क्रियापद |
| (d) | चांगला खेळला | (iv) | उद्देश्यविस्तार |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (3) | (iv) | (ii) | (i) | (iii) |
| (4) | (i) | (iii) | (ii) | (iv) |

---

26. शुद्ध शब्दयोगी अव्ययाची अचूक उदाहरणे कोणती ?

(a) फक्त रामच रावणवध करु शकला.
(b) शांतीचा संदेश म. गांधीजींनी सुद्धा सांगितला.
(c) तो अभ्यास करील, तूही अभ्यास कर.
(d) मला खाली बसणे आवडते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (c) बरोबर
(2) फक्त (b) आणि (d) बरोबर
(3) फक्त (a), (b) आणि (c) बरोबर
(4) फक्त (b), (c) आणि (d) बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

27. खालीलपैकी तद्भव शब्दांचा गट ओळखा :

(1) झाड, दगड, धोंडा, घोडा
(2) अर्ज, मंजूर, शाहीर, मालक
(3) पान, पाय, सासू, सासरा
(4) कर्ण, चक्र, विद्वान, जल

28. 'द्विपकल्प' या शब्दाचा अर्थ काय ?

(1) दोन्ही बाजूंनी पाणी असलेला प्रदेश
(2) तिन्ही बाजूंनी पाणी असलेला प्रदेश
(3) दोन नद्यांमधील जागा
(4) तिन्ही बाजूंनी जमीन असलेला देश

29. संयुक्त वाक्य करा.

'खाऊन माजावे टाकून माजू नये'.

(a) खाऊन माजले तर चालेल पण टाकून माजणे बरे नाही.

(b) टाकून माजू नये खाऊन माजलेले चालेल.

(c) खाऊन माजावे पण टाकून माजू नये.

(d) माजू नये टाकून खाऊन माजावे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a)
(2) फक्त (b)
(3) फक्त (c)
(4) वरील सर्व बरोबर

30. प्रचलित शुद्धलेखनानुसार **अचूक** शब्दगट ओळखा.

(a) उज्वल, अनुसया, उर्मी, तत्व
(b) प्रतिक्षा, रवींद्र, सहायक, मंदिर
(c) अंध:कार, निस्पृह, अधप्पात, पृथ:करण
(d) तिसरा, पोलिस, सफेत, नावीन्य

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (a) आणि (c) बरोबर
(2) केवळ (b) आणि (d) बरोबर
(3) केवळ (a) आणि (b) बरोबर
(4) केवळ (b) आणि (c) बरोबर

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

31. 'तुला मल्लखांबावर कसरत जमत नाही. मग त्या खांबास कशाला दोष देतोस?' वाक्याच्या संदर्भानुसार **योग्य** म्हणीचा पर्याय निवडा.

(a) नावडतीचे मीठ आळणी
(b) उचलली जीभ लावली टाळ्याला
(c) नाचता येईना अंगण वाकडे
(d) दुरुन डोंगर साजरे

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (a) व (b) बरोबर, (c) व (d) चूक
(2) केवळ (c) व (d) बरोबर, (a) व (b) चूक
(3) केवळ (a) बरोबर, (b), (c) व (d) चूक
(4) केवळ (c) बरोबर, (a), (b) व (d) चूक

---

32. खालील विधाने वाचा व **योग्य** पर्याय निवडा :

(a) नाम हा शब्द वस्तूवाचक नाही
(b) नाम ही शब्दजाती विकारी आहे. विकार होतांना नामाचे सामान्यरूप होते.
(c) नाम या शब्दातून प्राणी, पदार्थ व त्याच्या ठायीचे धर्म या सर्वांचा बोध होतो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर
(2) फक्त (a) आणि (c) बरोबर
(3) फक्त (b) आणि (c) बरोबर
(4) फक्त (c) बरोबर, (a), (b) चूक

---

33. उपसर्गांच्या बाबतीत –

(a) उपसर्गांना स्वत:चा सूचक अर्थ असतो
(b) उपसर्गामुळे शब्दाचा अर्थ बदलतो
(c) उपसर्ग हे शब्दाच्या शेवटी येतात

**पर्यायी उत्तरे :**

(1) वरील सर्व पर्याय बरोबर आहेत
(2) (a) व (c) बरोबर (b) चूक
(3) (a) व (b) बरोबर (c) चूक
(4) (b) व (c) बरोबर (a) चूक

---

34. कानडी भाषेतील शब्दांचा शब्दगट ओळखा.

(a) कदर, नेकी, मजूरी, गुलाब
(b) अमसोल, पडवळ, परडी, भांडे
(c) शिंपी, पेटी, बांबू, लवंग
(d) काजू, टिकाव, पेरू, हापूस

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (a) आणि (b) बरोबर
(2) केवळ (b) आणि (d) बरोबर
(3) केवळ (b) आणि (c) बरोबर
(4) केवळ (c) आणि (d) बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

35. मराठी भाषा लिपीस कोणत्या नावाने ओळखले जाते ?

(a) वर्णमाला लिपी
(b) देवनागरी लिपी
(c) बाळबोध लिपी
(d) आदर्श लिपी

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (b) बरोबर
(2) फक्त (b) आणि (c) बरोबर
(3) फक्त (a) आणि (d) बरोबर
(4) फक्त (d) बरोबर

---

36. खालील विधाने वाचा :

(a) एकच उद्देश एकच विधेय म्हणजे केवल वाक्य होय.
(b) जे वाक्य स्वतंत्र असते त्याला गौण वाक्य म्हणतात.
(c) दोन किंवा अधिक केवल वाक्य उभयान्वयी अव्ययांनी जोडणे म्हणजे पोट वाक्य होय.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर
(2) फक्त (a) व (b) बरोबर
(3) (a), (b) व (c) बरोबर
(4) (a), (b) व (c) चूक

---

37. तत्सम शब्दांचा शब्दगट ओळखा.

(a) सत्कार, समर्थन, भगवान, मस्तक
(b) धर्म, कर्म, पाय, घास
(c) पुष्प, कर, भूगोल, नदी
(d) कर्ण, पृथ्वी, गाव, ओठ

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (c) बरोबर
(2) फक्त (a) व (b) बरोबर
(3) फक्त (b) व (d) बरोबर
(4) फक्त (c) व (d) बरोबर

---

38. 'दिग्दर्शक अभिनेत्याशी नव्या चित्रपटाबद्दल चर्चा करीत होते.' या वाक्यातील विधेय आणि विधेयविस्तार हे घटक ओळखा.

(a) विधेय – अभिनेत्याशी विधेयविस्तार – नव्या, चर्चा
(b) विधेय – दिग्दर्शक विधेयविस्तार – चित्रपटाबद्दल
(c) विधेय – करीत होते विधेयविस्तार – ________
(d) विधेय – नव्या, चर्चा विधेयविस्तार – करीत

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (a) व (c) बरोबर, (b) व (d) चूक
(2) केवळ (b) बरोबर, (a), (c) व (d) चूक
(3) केवळ (c) बरोबर, (a), (b) व (d) चूक
(4) केवळ (d) बरोबर, (a), (b) व (c) चूक

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

39. स्वरांचे प्रकार व त्यांच्या व्याख्या यांच्या **योग्य** जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | दीर्घ स्वर | (i) | एकाच उच्चारस्थानातून निघणारे स्वर |
| (b) | संयुक्त स्वर | (ii) | भिन्न उच्चारस्थानातून निघणारे स्वर |
| (c) | सजातीय स्वर | (iii) | स्वरांचा उच्चार करण्यास अधिक वेळ |
| (d) | विजातीय स्वर | (iv) | दोन स्वर एकत्र येऊन बनलेले स्वर |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| (2) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (3) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (4) | (iv) | (iii) | (ii) | (i) |

---

40. एखाद्या शब्दाचे आकारान्त सामान्यरूप होत असेल तर __________.

(1) तो शब्द पुल्लिंगी आकारान्तच असला पाहिजे.

(2) तो शब्द स्त्रिलिंगी एकारान्तच असला पाहिजे.

(3) तो शब्द नपुंसकलिंगी ईकारान्तच असला पाहिजे.

(4) तो शब्द कोणत्याही लिंगाचा असला तरी आकारान्तच पाहिजे.

---

41. 'जो आपले काम करीत राहतो, तो मनुष्य देवाला प्रिय होतो.' या वाक्यातील उद्देश्य व उद्देश्यविस्तार ओळखा.

(a) उद्देश्य – मनुष्य, जो. उद्देश्यविस्तार – तो

(b) उद्देश्य – काम, आपले. उद्देश्यविस्तार – देवाला, प्रिय

(c) उद्देश्य – तो, करीत. उद्देश्यविस्तार – __________

(d) उद्देश्य – आपले, देवाला. उद्देश्यविस्तार – जो, तो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (a) व (b) बरोबर, (c) व (d) चूक

(2) केवळ (a) बरोबर, (b), (c) व (d) चूक

(3) केवळ (c) व (d) बरोबर, (a) व (b) चूक

(4) केवळ (d) बरोबर, (a), (b) व (c) चूक

---

42. 'चंद्र' या शब्दाचा समानार्थी शब्द खालीलपैकी कोणता ?

(a) इंदू (b) रजनीनाथ (c) सुधाकर (d) हिमांशू

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (b), (c) व (d) बरोबर (2) सर्व पर्याय बरोबर

(3) (a), (b), (c) बरोबर, (d) चूक (4) (a) व (d) चूक, (b) व (c) बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

43. योग्य जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | अव्ययीभाव समास | (i) | तिसऱ्या अर्थाचा बोध |
| (b) | तत्पुरुष समास | (ii) | पहिला शब्द प्रधान |
| (c) | द्वंद्व समास | (iii) | दुसरा शब्द प्रधान |
| (d) | बहुव्रीही समास | (iv) | दोन्ही शब्द प्रधान |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (2) | (ii) | (iv) | (iii) | (i) |
| (3) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| (4) | (iii) | (i) | (ii) | (iv) |

---

44. म्हणी व त्यांचे अर्थ यांच्या जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | दाम करी काम | (i) | वाईट कृत्य करणाऱ्याच्या मनात डाचत असते |
| (b) | पळसाला पाने तीनच | (ii) | क्षुद्र माणसे क्षुद्र वस्तुंना भाळतात |
| (c) | कोल्हा काकडीला राजी | (iii) | पैशाने सर्व कामे साध्य होतात |
| (d) | खाई त्याला खवखवे | (iv) | कोठेही गेले तरी मनुष्य स्वभाव सारखाच |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (i) | (iii) | (ii) |
| (2) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (3) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (4) | (ii) | (iv) | (i) | (iii) |

---

45. 'मन:पूर्वक' क्रियाविशेषणाचा प्रकार ओळखा.

(a) नामसाधित
(b) सर्वनामसाधित
(c) प्रत्यय साधित
(d) शब्दयोगी अव्ययसाधित

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (a) व (c) बरोबर
(2) केवळ (b) व (d) बरोबर
(3) केवळ (c) बरोबर
(4) केवळ (d) बरोबर

---

**प्रश्न क्र. 46 ते 50 - पुढील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे द्या.**

समाजामध्ये अनेक प्रकारच्या व्यक्ती असतात. 'व्यक्ती तितक्या प्रकृती'. या व्यक्तिवैविध्याचे सर्वसामान्य माणसांना कुतूहल असते. सर्जनशील लेखक या जिज्ञासेपोटी आगळ्यावेगळ्या व्यक्तींचे सूक्ष्म निरीक्षण करतात. अशा व्यक्तींच्या जीवनातील काही महत्त्वपूर्ण घटना, वैशिष्ट्यपूर्ण आठवणी व लक्षणीय जीवनप्रवास यांचा मागोवा घेतात. त्या व्यक्तीच्या जीवनावर, कार्यकर्तृत्वावर तसेच गुणवैशिष्ट्यांवर प्रकाश टाकतात. ही वैशिष्ट्ये एकत्र गुंफून समग्र व्यक्तिचित्र रेखाटतात. व्यक्तिचित्रणात वर्ण्य व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्यपूर्ण पैलू दर्शविण्यावर भर असतो. लेखक त्या व्यक्तीच्या जीवनातील ध्येयवाद, त्यांची ज्ञानोपासना, चिकाटी, त्यांची जिद्द इत्यादी गुणांनी ते कसे संपन्न आहेत हे जाणतात व त्याप्रमाणे व्यक्तिचित्रण करतात. अशीच कर्तृत्ववान, विपरीत परिस्थितीतही यशाची शिखरं गाठणारी दुर्मिळ माणसं समाजाला प्रेरणादायी ठरतात. व्यक्तिचित्र लेखक आपल्या लेखनाद्वारे वर्ण्य व्यक्तीकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहण्याची दृष्टी वाचकास देतो. वर्ण्य व्यक्तीतील असामान्यत्व त्याच्या लेखनाचा विषय होतो आणि राजहंसी वृत्तीने त्यातील नेमकेपण हेरून प्रभावी शब्दांद्वारे शब्दांकित करतो. व्यक्तिचित्र वाङ्मयाचा समाजाच्या घडणीत मोठा वाटा आहे, कारण ही व्यक्तिचित्रे सामान्य वाचकांसाठी जीवनमार्गावरील दीपस्तंभ ठरत असतात. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून हाती घेतलेल्या कार्यक्षेत्रात स्वत:चा ठसा उमटवणाऱ्या व्यक्तींचे व्यक्तिचित्र मनाला विशेष भावते. त्याबरोबरच सामान्यांतही असे काही गुणविशेष असतात की ज्यामुळे त्या व्यक्ती व्यक्तिचित्र लेखनाचा विषय होतात.

व्यक्तिचित्राचे मुख्य दोन प्रकार आहेत. पहिला प्रकार काल्पनिक व्यक्तिचित्रांचा आहे. काल्पनिक व्यक्तिचित्रात केंद्रस्थानी असलेली व्यक्ती उभी करण्यासाठी लेखक कल्पनेच्या भराऱ्या मारत असतो. ना.धों. ताम्हणकरांचा 'गोट्या' आणि पु.ल. देशपांडे यांची 'व्यक्ती आणि वल्ली' ही काल्पनिक व्यक्तिचित्रे अत्यंत प्रभावी आहेत.

दुसरा प्रकार वास्तवचित्रांचा आहे. ना.धों. महानोर यांचे 'ऐसी कळवळ्याची जाती', अरुण शेवते यांचे 'ज्यांच्या हाती शून्य होते' या प्रकारची व्यक्तिचित्रे अनेक लेखकांनी लिहिली आहेत. या व्यक्ती बहुतांश वेळा लेखकाच्या सान्निध्यात आलेल्या असतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित होऊन अशाप्रकारची व्यक्तिचित्रे रेखाटली जातात.

व्यक्तिचित्राचा विषय झालेली व्यक्ती सत्यसृष्टीतील, लेखकाच्या परिचयाची किंवा सामान्य वाचकांनाही माहीत असलेली असू शकते. सामान्य वाचकांच्या मनात त्या व्यक्तीविषयी असलेली 'प्रतिमा' लेखकाला विचारांत घ्यावी लागते. यासाठी त्या व्यक्तीचे व्यक्तिचित्रण करताना वाचकांना धक्का देणे हा लेखकाचा हेतू नसतो तर त्या व्यक्तीबद्दलचा वेगळा दृष्टिकोन, वेगळे मूल्यमापन सादर करणे हा असतो.

---

**46.** कोणते व्यक्तिचित्र वाचकाच्या मनास विशेष भावते ?

(1) अनुकूल परिस्थितीवर मात करून यशस्वी होणारी व्यक्ती

(2) प्रतिकूल परिस्थितीवर मात करून कार्यक्षेत्रात स्वत:चा व कुटुंबाचा ठसा उमटवणारी व्यक्ती

(3) अनुकूल व प्रतिकूल अशा परिस्थितीवर मात करून कार्यक्षेत्रात स्वत:चा ठसा उमटवणारी व्यक्ती

(4) प्रतिकूल परिस्थितीवर मात करून स्वत:चा ठसा कार्यक्षेत्रात उमटवणारी व्यक्ती

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

47. सर्वसामान्य माणसांना कशाचे कुतूहल असते ?

(1) व्यक्तींचा विविध स्वभाव (2) व्यक्तींचे व्यक्तिमत्त्व

(3) व्यक्तिवैविध्य (4) व्यक्तीचे गुण व मोठेपण

---

48. राजहंसी वृत्ती म्हणजेच __________ होय.

रिकाम्या जागी **योग्य** शब्द खालीलपैकी कोणता ?

(1) षटकर्णीविवेक (2) नीरक्षीरविवेक (3) काकदृष्टीविवेक (4) सद्सद्विवेक

---

49. व्यक्तिचित्रण करताना लेखकाचा कोणता हेतू असतो ?

(1) वाचकांना वैचारिक धक्का देणे.

(2) व्यक्तीबद्दलचे आकलन व मूल्यमापन करणे.

(3) व्यक्तीचा ध्येयवाद, ज्ञानोपासना व चिकाटी या गुणांची ओळख करून देणे.

(4) व्यक्तीबद्दलचा वेगळा दृष्टिकोन, वेगळे मूल्यमापन करणे.

---

50. उताऱ्यात 'मार्गदर्शन करणे' या अर्थाचा कोणता वाक्प्रचार आलेला आहे ?

(1) मागोवा घेणे (2) दीपस्तंभ ठरणे

(3) राजहंसी वृत्तीने मार्गदर्शन करणे (4) प्रकाश टाकणे

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

51. Choose the **correct** type of adjective of the underlined word :

<u>Those</u> rascals must be punished.

(1) Demonstrative adjective (2) Distributive adjective
(3) Quality adjective (4) Quantity adjective

52. Which mood is expressed in the following sentence ?

Take care of your health.

(1) Imperative (2) Subjunctive
(3) Indicative (4) None of these

53. Which of the following is the **correct active voice** of the following sentence :

I shall be obliged to go.

(1) Circumstances will oblige me to go.
(2) Destiny oblige me to go.
(3) Forcefully I oblige to go.
(4) It is oblige me to go.

54. Choose the **correct** sentence/s :

(a) We have lived in the village since 1987.
(b) We have been living in the village since 1987.
(c) We are living in the village since 1987.

**Answer options :**

(1) (c) only (2) (b) only
(3) Both (a) and (b) (4) Both (b) and (c)

55. Choose the **correct indirect** narration of the following sentence :

' Do you wish to open an account ? ' the accountant said to the man.

(1) The accountant asked the man that he wished to open an account
(2) The accountant asked the man if he wished to open an account
(3) The accountant questioned the man that he wished to open an account
(4) The accountant asked the man if you wished to open an account

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

56. Identify transitive and intransitive verbs in the given sentences :

(a) The rain revived the wilting shrubs.

(b) The dog chased the man.

(c) The choir sang badly that morning.

**Answer options :**

(1) Intransitive, Intransitive, Transitive

(2) Transitive, Intransitive, Transitive

(3) Intransitive, Transitive, Intransitive

(4) Transitive, Transitive, Intransitive

---

57. The words closest in meaning to ABSCOND are

(a) RETREAT (b) DECAMP (c) ABSOLVE

**Answer options :**

(1) (a) only (2) (a) and (b) only

(3) (a) and (c) only (4) (a), (b) and (c)

---

58. Identify the correct alternative in which words are spelt **correctly** :

(1) hemisphere, litterateur, pasteurize, resemblance

(2) hemisphere, literateur, pasteurise, resemblence

(3) hemisphare, literateur, pasterize, resemblence

(4) hemisphere, litteretur, pasturise, resemblance

---

59. Anushka is ambidextrous, which means -

(1) able to think two ways simultaneously

(2) able to use both hands equally well

(3) able to deal with critical circumstances

(4) able to see two different views

---

60. Change the following sentence/s into a single sentence :

Yesterday the temperature was six degrees. Today it's only three degrees.

(1) It's colder today, than yesterday.

(2) It's colder today, than it was yesterday.

(3) It's colder than it was yesterday.

(4) It's colder than yesterday.

---

61. Choose the **correct** sentence :

(a) The cat licked it's paw.

(b) The club cheered for its team.

(c) It's Five hours until my birthday.

**Answer options :**

(1) Only (a) is correct

(2) Only (b) is correct

(3) Only (c) is correct

(4) Both (b) and (c) are correct

---

62. Choose the **correct** compound form of the following sentence ;

He is more a philosopher than a poet.

(1) He is something of a poet, but rather more of a philosopher.

(2) He is a philosopher and a poet.

(3) He is something philosopher, but rather more of a poet.

(4) He is philosopher or a poet.

---

63. Which of the following is the **correct** passive voice of the following sentence :

Do not disturb the class.

(1) The class should not be disturbed.

(2) Let the class not be disturbed.

(3) The class is not disturbed by them.

(4) All the above.

---

64. Choose the correct form of Indirect speech of the following sentence :

He said, 'Let's leave the case at the station'.

(1) He suggested leaving the case at the station.

(2) He said that let's leave the case at the station.

(3) He requested to leave the case at the station.

(4) He suggested to leave the case at the station.

---

65. Choose the **appropriate** question tag :

You'd rather go, ____ ?

(1) hadn't you (2) didn't you

(3) doesn't you (4) wouldn't you

---

66. Choose the **correct** transformation of the following sentences :

(a) It is a very wonderful opportunity → what a wonderful opportunity !

(b) It is very kind of you to help him like that → How kind of you to help him like that !

(c) These are awful shoes → what awful shoes !

**Answer options :**

(1) Only (a) is incorrect (2) Only (b) is incorrect

(3) Only (c) is incorrect (4) All (a), (b) and (c) are correct

---

67. Choose the **correct** pair to fill in the blanks :

(a) Only the most __________ person would believe such a feeble excuse.

(b) What an __________ excuse !

**Answer options :**

(1) ingenuous, ingenious (2) ingenious, ingenuous

(3) ingenious, inexperienced (4) none of the above

---

68. Choose the **incorrectly** spelt word/s from the following words :

(a) reterate (b) phoenix (c) calender (d) ennui

**Answer options :**

(1) (b) and (d) (2) (c) (3) (a) and (c) (4) (a) and (d)

---

69. Fill in the blank :

He was afraid to see _____ of lions.

(1) group (2) pride (3) many (4) lot

---

70. An adverb qualifies :

(a) a verb (b) another adverb

(c) an adjective (d) pronoun

**Answer options :**

(1) (a) is incorrect (2) (d) is incorrect

(3) (b) and (c) are incorrect (4) (a) and (c) are incorrect

---

71. Fill in the blank with the cohesive device :

________, the problem is a significant one.

(1) Not with standing (2) Not withstanding

(3) Notwithstanding (4) Otherwise

---

72. Use the appropriate pair for the underlined words :

Tom is unwilling to tell me. If he would tell me what he wants for his dinner, I'd have cooked it for him.

(1) If he would tell me, I'd cook it

(2) If he tells me, I'd cook it

(3) If he will tell me, I'd have cooked it

(4) If he had told me, I had cooked it

---

73. Identify the **incorrect** use of Article in the following sentence/s :

(a) The man is mortal.

(b) The gold is a precious metal.

**Answer options :**

(1) (a) only (2) Both (a) and (b)

(3) (b) only (4) None of these

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

74. Choose the **correct** complex version of the following sentence :

He aimed at winning the prize and he worked hard.

(1) He worked hard so that he will win the prize.

(2) He worked hard so that he might win the prize.

(3) He had to work hard that he will win the prize.

(4) He will work hard so that he might win the prize.

---

75. Match the following :

| | (A) | | (B) |
|---|---|---|---|
| (a) | Polygamy | (i) | devotion to a lonely and austere life |
| (b) | Misogamy | (ii) | skill cleverness |
| (c) | Asceticism | (iii) | custom in which one man has many wives |
| (d) | Adroitness | (iv) | hatred of marriage |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (iii) | (ii) | (iv) |
| (2) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (3) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (4) | (iv) | (iii) | (i) | (ii) |

---

76. Identify the **incorrect** sentence/s from the following :

(a) I take pride to serve my country.

(b) He is addicted to smoke.

(c) You are fortunate in having an intelligent and obedient son.

**Answer options :**

(1) (a) and (c) (2) (b) and (c) (3) (b) only (4) (a) and (b)

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

77. Identify the **incorrect** sentence/s :

(a) The wages of sin are death

(b) I have many works to do

(c) Do not make friends with selfish people

**Answer options :**

(1) (a) and (c) (2) (a) and (b) (3) (b) and (c) (4) Only (a)

---

78. Which of the following is **not** the meaning of 'bear' ?

(1) to go or turn in the direction mentioned

(2) to take responsibility

(3) to deal with something unpleasant

(4) to weep for some loss

---

79. Choose the **correct** passive form of the following sentence :

After driving professor Kumar to the museum she dropped him at his hotel.

(1) After driving professor Kumar to the museum she was dropped him at his hotel.

(2) After driving to the museum professor Kumar was dropped at his hotel.

(3) After driving professor Kumar was dropped at his hotel.

(4) After being driven to the museum professor Kumar was dropped at his hotel.

---

80. Choose the **correct** Indirect speech of the following sentence :

He said, "I was writing letters."

(1) He said that he was writing letters

(2) He said that he had been writing letters

(3) He told that he was writing letters

(4) He said that he had written letters

---

81. Choose the **correct** meaning of the underlined idiom :

When I entered the house everything was at sixes and sevens .

(1) in disorder (2) in appropriate position

(3) in order (4) in darkness

---

**82.** Jenny said,

(a) "My parents are very well."

(b) "I can't come to the party tomorrow."

(c) "I don't have much free time."

(d) "I will phone you when I get back."

The Indirect Narration of these sentences respectively are :

(i) Jenny said that her parents were very well.

(ii) She said that she could not come to the party tomorrow.

(iii) She said that she had no much free time.

(iv) She said that she would phone you when I get back.

Choose the appropriate option :

(1) (i) and (ii) are incorrect

(2) (iii) and (iv) are incorrect

(3) (i) and (iii) are incorrect

(4) (ii) and (iv) are incorrect

---

**83.** Choose the **correct** sentence/s :

(a) Scarcely anyone turned up, did they ?

(b) Scarcely no one turned up.

**Answer options :**

(1) Only (a) is correct

(2) Only (b) is correct

(3) Both (a) and (b) are correct

(4) Both (a) and (b) are incorrect

---

**84.** Identify the **incorrect** adverb/s :

(a) fastly

(b) contemptuously

(c) slowly

(d) academically

(e) seemly

**Answer options :**

(1) (b) and (a)

(2) (a) and (e)

(3) (c) and (d)

(4) (a) and (d)

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

85. Which of the following sentence/s is/are **correct** ?

(1) If we had found him earlier we have to save his life.

(2) If we had found him earlier we might have saved his life.

(3) If we have found him earlier we might save his life.

(4) If we will find him earlier we may have saved his life.

---

86. Identify the **correct** meaning of the underlined word in the given context :

Before I started the job I had no preconceived notions

(1) Ideas or opinions formed after you have enough information of something

(2) Ideas or opinions formed before you have enough information

(3) Ideas or opinions formed after loosing information of something

(4) None of these

---

87. Study the following sentences and choose the most appropriate option :

(a) Entering the village from the western side, the church soon comes into view.

(b) Entering the village from the western side, we soon obtain a view of the church.

(c) As one enters the village from the western side, the church soon comes into view.

**Answer options :**

(1) Only (a) and (b) are grammatically acceptable

(2) Only (b) and (c) are grammatically acceptable

(3) Only (a) and (c) are grammatically acceptable

(4) All (a), (b) and (c) are grammatically acceptable

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

88. Choose the **correct** meaning of the underlined idiom :

When it comes to geography, he certainly knows his stuff.

(1) He has a very poor knowledge of it.

(2) He has a very good knowledge of it.

(3) He has no sense of the subject.

(4) He has no relation with the subject.

---

89. Study the following statement/s and answer :

Tense is the form of the verb used to indicate ________.

(a) The time of the action

(b) The continuance of the action

(c) The completeness of the action

**Answer options :**

(1) Only (a) is true (2) Only (b) is true

(3) Only (c) is true (4) All statements (a), (b) and (c) are true

---

90. Choose the **correct** expressions :

(a) As cheap as sand

(b) As gay as lark

(c) As dead as mutton

**Answer options :**

(1) (a) and (c) only (2) (b) and (c) only

(3) (c) only (4) (a), (b) and (c)

---

91. Choose the **correct** meaning of the underlined idiom in the sentence :

All my warnings fell on stony ground.

(1) were carefully listened (2) were ignored

(3) were followed (4) were repeated

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

92. Choose the word opposite in meaning to the one in capitals in the given sentence.

She didn't have the slightest COMPUNCTION about telling me a lie.

(1) CONFLAGRATION (2) AUDACITY

(3) ABSTEMIOUS (4) ABJURATION

---

93. Identify the **correct** sentences :

(a) The basket of apples and pears were hanging from a hook.

(b) This must be one of the best plays that have been staged at Stratford this season.

(c) The success of the new branch is one of the recent developments that justify our faith in the company.

**Answer options :**

(1) (a) and (c) only (2) (b) and (c) only

(3) (c) only (4) (a), (b) and (c)

---

94. Which of the following is the **incorrect** meaning of 'Acknowledge' ?

(1) Admit (2) Express thanks

(3) Recognise (4) None of these

---

95. Choose the **modal auxillary** for the underlined words in the following sentence :

It was not necessary for me to buy it.

(1) I don't need to buy it. (2) I didn't used to buy it.

(3) I don't used to buy it. (4) I didn't need to buy it.

---

**Read the passage carefully and answer the questions (96 to 100) :**

The rampant commercialization of schools is corrupting in two ways. First, most corporate-sponsored curricular material is ridden with bias, distortion and superficial fare. A study by Consumers Union found, not surprisingly, that nearly 80 percent of sponsored educational materials are slanted toward the sponsor's product or point of view. But even if corporate sponsors supplied objective teaching tools of impeccable quality, commercial advertising would still be a pernicious presence in the classroom, because it is at odds with the purpose of schools. Advertising encourages people to want things and to satisfy their desires. Education encourages people to reflect critically on their desires, to restrain or to elevate them. The purpose of advertising is to recruit consumers; the purpose of public schools is to cultivate citizens.

It isn't easy to teach students to be citizens, capable of thinking critically about the world around them, when so much of childhood consists of basic training for a consumer society. At a time when many children come to school as walking billboards of logos and labels and licensed apparel, it is all the more difficult-and all the more important-for schools to create some distance from a popular culture steeped in the ethos of consumerism.

But advertising abhors distance. It blurs the boundaries between places and makes every setting a site for selling. "Discover your own river of revenue at the schoolhouse gates!" proclaimed a brochure promoting a marketing conference for school advertisers. "Whether it's first-graders learning to read or teenagers shopping for their first car, we can guarantee an introduction of your product and company to these students in the traditional setting of the classroom!"

As the marketers storm the schoolhouse gates, cash-strapped schools, reeling from recession, property tax caps, budget cuts, and rising enrollments, feel no choice but to let them in. But the fault lies less in our schools than in us citizens. Rather than raise the public funds we need to educate our children, we choose instead to sell their time and rent their minds to Burger King and Mountain Dew.

---

**96.** What is the condition of public schools ?

(a) Schools are in poor economic condition.

(b) Schools have sufficient funds.

(c) Schools are supported by the government.

(d) Schools are using sponsor's educational material because they are badly in need of money.

**Answer options :**

(1) (a) and (d) (2) (a) and (b) (3) (b) and (c) (4) (c) and (d)

---

97. Match the following :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | rampant | (i) | subjects, syllabus |
| (b) | abhor | (ii) | perfect |
| (c) | ethos | (iii) | becoming worse and worse |
| (d) | impeccable | (iv) | set of beliefs and ideas |
| (e) | curriculum | (v) | detest |
| (f) | pernicious | (vi) | dangerous |
| | | (vii) | good |

**Answer options :**

(1) (a)-(i), (b)-(iii), (c)-(iv), (d)-(ii), (e)-(vii), (f)-(vi)

(2) (a)-(v), (b)-(iii), (c)-(ii), (d)-(vi), (e)-(i), (f)-(vii)

(3) (a)-(iii), (b)-(v), (c)-(iv), (d)-(ii), (e)-(i), (f)-(vi)

(4) (a)-(vii), (b)-(vi), (c)-(ii), (d)-(iv), (e)-(iii), (f)-(i)

---

98. Read the following passage carefully and answer the questions given below :

According to the passage, commercialization of school is ________.

(a) desirable in the present situation.

(b) not distorting at all.

(c) degrading and corrupting.

(d) None of the above

**Answer options :**

(1) (a) and (b) (2) (c) and (b) (3) (c) only (4) (d) only

---

99. Difference between Advertising and Education is that ________.

(a) Both Advertising and Education give knowledge.

(b) Advertising creates more needs in the people's mind.

(c) Education makes people to think about their desires.

(d) Advertising turns people into consumers.

(e) Education tries to cultivate citizens.

**Answer options :**

(1) (a), (b), (c) (2) (c), (d), (e) (3) (a), (c), (d), (e) (4) (b), (c), (d), (e)

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

**100.** Which statements are **false** according to the passage :

(a) Public schools allow marketers because of poor economic conditions.

(b) Purpose of public schools is to cultivate citizens.

(c) It is not difficult to teach students to be citizens when their childhood is surrounded by advertiser.

(d) Sponsor's educational material is not inclined towards their products and ideology.

(e) Schools do not get influenced by consumerism

(f) Commercial advertising in school is good for the society.

(g) Public should not sell their children's time and rent their minds to the corporate companies.

**Answer options :**

(1) (a), (b), (c), (g) (2) (c), (d), (e), (f) (3) (a), (b), (d), (g) (4) (d), (e), (f), (g)

-o0o-

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

## सूचना — (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्र. क्र. 201. "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे
(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल, यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

SEAL